


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २० वा | सोमवार | दि. १७ फेब्रुवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बुलढाणा जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाईसाठी

# आता गृह मंत्रालय ॲक्शन मोडवर

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला गृह विभागाकडून चौकशी व कारवाईचे निर्देश

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्रभर गाजत असलेल्या येथील जिल्हा रुग्णालयात कार्यरत राहून यथेच्छ भ्रष्टाचार करणारे तसेच त्या भ्रष्टाचारातून अवैधरित्या संपत्ती जमवणाऱ्यांची तात्काळ चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, यासंदर्भातील निर्देश राज्याच्या गृह मंत्र्यालयाकडून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकांना जारी करण्यात आले आहेत. या आदेशानंतर तरी जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाऱ्यांची करोडो रुपयांची संपत्ती जप्त करून शासनदप्तरी जमा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज तथा सामाजिक कार्यकर्त्यांच्या सततच्या पाठपुराव्यांमुळे हे शक्य झाले असून, जोपर्यंत यासंदर्भात पूर्णपणे कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज यासंदर्भात सातत्याने प्रयत्न करीत राहणार आहे. येथील जिल्हा रुग्णालयात पावलोपावली जो काही बेबंद भ्रष्टाचार सुरू आहे, तो संपूर्ण भ्रष्टाचार दैनिक जनसंचलनच्या वतीने आपल्या वृत्तमालिकेच्या माध्यमातून जनतेसमोर ठेवण्याचे काम केलेले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात कार्यरत असलेली प्रकाश नामदेव बोथे यांच्यासारखी भ्रष्टाचाराची कीड आणि त्यांच्या साथीने भ्रष्टाचार करणारे इतर सहकारी या सर्वांनी वर्षानुवर्षे केलेल्या भ्रष्टाचाराच्या पैशांमधून मोठ्या प्रमाणात बेनामी संपत्ती अर्जित केली आहे. यातील अनेक विभागातील भ्रष्टाचाऱ्यानी स्वतः च्या किंवा नातेवाईकांच्या नावावर चल अचल संपत्ती खरेदी केल्या आहेत. या सर्वांनी शासनाला गंडवून संपत्ती जमवल्याने ती शासन दप्तरी जमा करणे, तसेच भ्रष्टाचारातून संपत्ती जमवणाऱ्यांवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करणे अपेक्षित आहे. याच्या अगदी उलट जिल्हा रुग्णालयात जे कोणी भ्रष्टाचार करतात, अशा भ्रष्टांवर कारवाई होण्याऐवजी त्यांना बढत्या मिळतात किंवा मलाईदार ठिकाणी बदल्या मिळतात. प्रकाश नामदेव बोथे यांच्या प्रकरणात सगळ्या बुलढाण्याने हे पाहिलेले आहे. प्रकाश बोथे सारख्यांनी भ्रष्टाचार करताना कोणतीही लाज-शरम बाळगलेली नाही. निर्लज्जपणे भ्रष्टाचार केला आणि त्यांच्या भ्रष्टाचाराला अधिकाऱ्यांचा वरदहस्त प्राप्त झाला. आज केवळ बोथेंवर बडतर्फीची कारवाई झालेली आहे. परंतु त्यांनी भ्रष्टाचारातून जमवलेली करोडो रुपयांची संपत्ती शासन दप्तरी जमा होणे गरजेचे आहे. यासंदर्भात बुलढाणा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे माहिती देण्यात आलेली आहे, परंतु त्यासंदर्भात योग्य ती कारवाई अजून झालेली नाही. आता दि. ७ फेब्रुवारी रोजी राज्याच्या गृह विभाग (मुंबई) येथील कक्ष अधिकारी दीप्ती परुळेकर यांनी एक पत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकांना पत्र देऊन सांगितले आहे की, जिल्हा सामान्य रुग्णालयात कार्यरत ज्या लोकसेवकांनी भ्रष्टाचारातून संपत्ती जमवल्या आहेत, त्यांची चौकशी करून एक अहवाल लवकरात लवकर पाठवावे, असे निर्देश दिले आहेत. या निर्देशांनंतर तरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला जाग यावी आणि यासंदर्भात त्यांनी चौकशी व कारवाई करणे अपेक्षित आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडे जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार प्रकरणाचे सज्जड पुरावे आहेत, गरज पडल्यास ती सर्व कागदपत्रे बुलढाणा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला देण्याची आमची तयारी आहे. फक्त भ्रष्टाचाऱ्यांवर फौजदारी कारवाई आणि त्यांची संपत्ती जप्त झालीच पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणी केवळ बोथे यांच्यावर कारवाई होऊन चालणार नाही. या भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत आजवर या ठिकाणी येऊन गेलेले जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पंडित, डॉ. तडस सह इतर यांच्यासारख्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवरही कारवाई होणे अपेक्षित आहे. एक-एक अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेऊन चौकशी व कारवाई केल्यास यात अनेकांची नावे समोर येतील. जोपर्यंत ही कारवाई होत नाही, तोपर्यंत जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार काही केल्या थांबताना दिसून येत नाही. त्यामुळे लवकरात लवकर भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संपत्ती जप्त करण्याची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने करणे गरजेचे आहे. या कारवाईत दैनिक जनसंचलनकडून पूर्णपणे सहकार्य करण्यात येईल व भ्रष्ट अधिकाऱ्यांन गजाआड पाठवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.

**दिव्यांग व अस्तिव्यंग बोगस प्रमाणपत्र प्रकरणात कोणी कोणी जमवली करोडो रुपयांची माया संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्याची पूर्व परिस्थिती व आजची परिस्थितीची खोलवर जाऊन जमा केलेली माहिती पुढील सत्रात**




अजून बरेच काही पुढील भागात..

# गोरक्षक बनले भक्षक?कृष्णाई गोशाळेच्या ४५ गोवंशांची कोंबून वाहतूक..३ वाहनांसह १९ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त!

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

४५ गोवंशांची कोंबुन विनापरवाना वाहतूक केल्याप्रकरणी तीन आयशर वाहनांसह १९ लाख २० हजार रुपयाचा मुद्देमाल जळगाव जामोद पोलिसांनी पोलीस स्टेशनला आणून जप्त केल्याने खळबळ उडाली आहे. १४ फेब्रुवारी रोजी रात्री ९:३० चे दरम्यान तीन आयशर वाहनांमध्ये ४५ जनावरे विना परवानगी तसेच वाहनांमध्ये कोंबलेल्या स्थितीत पोलिसांना पिंपळगाव काळे येथे नाकाबंदी दरम्यान दिसून आले आहे. यावेळी पोलीस उपनिरीक्षक स्नेहा शेडगे यांनी जनावरे वाहतूक प्रकरणी तीनही आयशर वाहनांकडे वाहतूक परवाना असल्याचे विचारणा केली असता तिन्ही वाहनचालकांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. यावेळी पिंपळगाव काळे येथील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यामध्ये निळ्या व पांढऱ्या रंगाचे आयशर क्रमांक एमएच १८ बीए ४७०७, तपकिरी रंगाचे आयशर क्रमांक एमएच ३० बीबी २८२७ व एमएच ४२ टी १६६१ या तीन वाहनांमध्ये कृष्णाई गोशाळेच्या ४५ गाई कोंबलेल्या स्थितीत मिळून आल्या. यावरून तिन्ही वाहने जळगाव जामोद पोलीस स्टेशनला आणण्यात आली होती. यावेळी घटनास्थळी नागरिकांच्या चर्चांना उधाण आले होते यामध्ये जळगाव जामोद गोवंश तस्करी वाढली हिंदू गाडी चालक गोरक्षक भक्षक असल्याची चर्चा रंगली! यावेळी पोलिसांनी पंचांसमक्ष पंचनामा करून तिन्ही वाहने पोलिसांनी ताब्यात घेतली व तिन्ही वाहनाचे चालक आसिफ शेख युसुफ वय ३७ वर्षे राहणार साखळी तालुका यावल जिल्हा जळगाव खान्देश, वसंत रामकृष्ण म्हसाळ वय ५२ वर्ष राहणार गंगानगर जळगाव जामोद, अशोक पांडुरंग ढगे वय ५० वर्ष राहणार आचल नगर जळगाव जामोद यांच्यावर अप नंबर ८२/२०२५ कलम ११(१)(घ)(ड)(च) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० प्रमाणे सरकारतर्फे महिला पोलीस उपनिरीक्षक स्नेहा शेडगे यांच्या तक्रारीवरून तिन्ही आरोपीतांवर गुन्हा दाखल केला असून तीनही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास ठाणेदार श्रीकांत निचळ यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक अमोल पंडित करीत आहेत.

# लहुजी राघोजी साळवे: भारतीय क्रांतिकारककांचे गुरु !

**संपादकीय लेख**

**भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहुजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी इङ्कमरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठीच अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी अनेक देशभक्तांना आपल्यातील युद्धकला शिकवली. अशा महान क्रांतिगुरूची महती त्यांच्या स्मृतिदिनी श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी वर्णन करीत आहेत... संपादक.**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात लहुजींचे पूर्वज पराक्रम गाजवीत. साळवे घराणे सशस्त्र विद्येमध्ये निपुण व तरबेज होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकाळात लहूजींच्या पूर्वजांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात साळवे घराण्याची योग्यता ओळखून पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी लहुजी साळवे यांच्या आजोबांकडे सोपवली होती. पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणासाठी साळवे घराण्यातील अनेक वीरपुरुषांनी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरींमुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी लहुजींच्या पूर्वजांना राऊत या पदवीने गौरविले होते.

वस्ताद लहुजी राघोजी साळवे हे खरेतर लहुजी वस्ताद नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावातील एका कुटुंबात झाला. मातंग समाजात जन्माला आलेल्या लहूजींना युद्धकलेचे प्रशिक्षण त्यांच्या घरातील वीर पुरुषांकडून मिळाले होते. लहूजींच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे व आईचे नाव विठाबाई होते. लहुजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे अतिशय पराक्रमी पुरुष होते. युद्ध कलेमध्ये त्यांचा कोणीही हात धरू शकत नसे. वाघाबरोबर लढाई करण्याच्या पराक्रमामुळे लहुजी साळवे यांचे वडील राघोजी साळवे त्याकाळी प्रसिद्ध होते. एकदा त्यांनी वाघाबरोबर युद्ध केले आणि जिवंत वाघाला खांद्यावर घेऊन पेशव्यांच्या राजदरबारी सादर केले होते. असे त्यांनी आपल्या प्रचंड शक्तीचे प्रदर्शन केले होते.

पुढे दि.५ नोव्हेंबर १८१७ला पेशव्यांचे इंग्रजांसोबत खडकी येथे तुंबळ युद्ध झाले. तब्बल १२ दिवसांपर्यंत राघोजी व २३ वर्षे वयाच्या लहुजी यांनी आपल्या मावळ्यांना सोबत घेऊन इंग्रजांविरुद्ध निकराचा लढा दिला. लहुजींचे वडील राघोजी साळवे वाऱ्याच्या वेगाप्रमाणे शत्रूवर तुटून पडले होते. ते तलवारीचे सपासप वार करत शत्रुंना जमिनीवर लोळवत होते. अखेर या संकटातून बाहेर पडण्यासाठी घाबरलेल्या इंग्रजांनी एकत्रित वार करून राघोजींना धारातीर्थी पाडले. राघोजी या युद्धात इंग्रजांच्या हातून लहुजींच्या समोरच शहीद झाले. त्यावेळी पेशव्यांचा पराभव झाला. पुढे इ.स.१८१८मध्ये मराठा साम्राज्याचा भगवा ध्वज शनिवारवाड्यावरून हटवून तेथे इंग्रजांचा युनियन जॅक फडकला. या पराभवाने लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्वाला भडकली. स्वातंत्र्यप्रेम, देशभक्ती, देशप्रेम यांनी झपाटलेले लहुजी आपल्या वडिलांच्या मृत्यूच्या दु:खातून सावरले. आपल्या वडिलांना आपल्या डोळ्या देखतच शहीद झालेले पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. भारतमातेला इंग्रजांपासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झाले. त्याच ठिकाणी क्रांतिवीर लहूजींनी दि.१७ नोव्हेंबर १८१७ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली अर्पण करतानाच त्यांनी इङ्कमरेन तर देशासाठी आणि जगेन तरीही देशासाठीङ्क अशी क्रांतिकारी प्रतिज्ञाही केली होती. त्यांनी आपल्या वडिलांची समाधी उभारली. ही समाधी अजूनही पुणे-शिवाजी नगरजवळच्या वाकडेवाडी येथे आहे.

क्रांतिगुरू लहुजी हे दांडपट्टा चालवणे, तलवारबाजी, घोडेस्वारी, बंदूक चालवणे व निशाणेबाजी अशा सर्व युद्धकला कौशल्यांमध्ये निपुण होते. त्यांचे पिळदार शरीर व उभरलेली छाती पाहून शत्रूला सुद्धा घाम फुटत असे. जीवघेण्या शस्त्रांबरोबर ते अगदी एखाद्या खेळण्याप्रमाणे खेळत असत. आपल्या वडिलांचा मृत्यू व इंग्रजांनी केलेला पराभव त्यांना असह्य झाला. पराक्रमी घराण्यातील लहुजींनी इंग्रजांवर मात करण्यासाठी म्हणजे पर्यायाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी मवाळपंथी नव्हे तर जहाल क्रांतिकारक निर्माण करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी आपल्या अंगी असलेले युद्धकलेचे शिक्षण तरुणांना देण्याचे ठरविले. म्हणून त्यांनी इ.स.१८२२मध्ये पुण्यातील रास्ता पेठ येथे देशातील पहिले युद्ध कलाकौशल्य तालीमकेंद्र उघडले. ते नाना रास्ते सरदार यांच्या हस्ते सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्वच समाजांतील युवक तालीम घेण्यासाठी येऊ लागले. यात प्रामुख्याने बाळ गंगाधर टिळक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा जोतीराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, चापेकर बंधू, क्रांतिभाऊ खरे, क्रांतिवीर नाना दरबारे, रावबहादूर सदाशिवराव गोवंडे, नाना मोरोजी, क्रांतिवीर मोरो विठ्ठल बाळवेकर, क्रांतिवीर नाना छत्रे, महात्मा जोतीराव फुलेंचे सहकारी वाळवेकर आणि परांजपे हे देखील लहुजी साळवे यांच्या आखाड्यातच शिकले. इ.स.१८४८ साली लहूजींच्या याच तालमीत सावित्रीमाई फुले यांची पहिली मुलींची शाळा सुरू झाली होती. म्हणून ते आद्य महाक्रांतिगुरू ठरतात, यात मुळीच शंका नाही.

दि.२० जुलै १८७९ रोजी इंग्रजांनी वासुदेव बळवंत फडके यांना देवरनावडगा मुक्कामी रात्री झोपेत असताना पकडले व त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. दि.७ नोव्हेंबर १८७९ रोजी वासुदेव फडके यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. हे ऐकून लहुजींच्या मनावर खूप मोठा आघात झाला. अवघ्या तेरा महिन्यांनी म्हणजेच दि.१७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्याच्या संगमपुराच्या परिसरात एका झोपडीवजा घरामध्ये लहुजी साळवेजींची प्राणज्योत मालवली. त्याबरोबरच एका महा क्रांतिपर्वाचा शेवट झाला. त्यांची समाधी पुण्यातील संगमवाडी येथे आहे.

!! आद्य महाक्रांतिगुरु लहुजींना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !!

# अल्पसंख्याक विद्यार्थीबहुल शाळांना पायाभूत सुविधांसाठी आता 10 लाखापर्यंत अनुदान मिळणार

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि अपंग शाळांतील पायाभूत सुविधांसाठी अनुदान योजना आता सुधारित स्वरूपात लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शाळांना पूर्वी मिळत असलेल्या दोन लाख रुपयांच्या अनुदानाची मर्यादा वाढवून १० लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. यामुळे अल्पसंख्याक बहुल शाळांना अधिक सोयीसुविधांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून जिल्हयातील पात्र इच्छुक शाळांनी अनुदानासाठी सुधारित परिपूर्ण प्रस्ताव २२ फेब्रुवारीपर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

शासनाने दि. ७ ऑक्टोबर २०२४ शासन निर्णयानुसार अनुदानाची मर्यादा वाढवल्याने यापूर्वी दि. १९ जुलै २०२४ रोजीच्या परिपत्रकाद्वारे पात्र शाळांकडून मागविण्यात आलेले पूर्वीचे सर्व प्रस्ताव रद्द केले आहे. त्याऐवजी, आता नव्याने प्रस्ताव मागविले जात असून, इच्छुक शाळांनी सुधारित प्रस्ताव सादर करावेत. शुध्दपेयजलवइन्वर्टरसुविधांनाप्राधान्य अल्पसंख्याक समुदायासाठी जाहीर करण्यात आलेला मा. पंतप्रधान यांचा १५ कलमी कार्यक्रम व सच्चर समितीच्या अहवालाच्या आधारे केंद्रशासनाने घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने, अल्पसंख्याक शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी शुध्द पेयजलाची व्यवस्था करणे तसेच ग्रामीण, निमशहरी भागातील लोडशेडींगमुळे किंवा अतिपर्जन्याच्या भागामध्ये पावसामुळे वारंवार विद्युत पुरवठा खंडीत होत असल्यामुळे अल्पसंख्याक बहुल शाळांमध्ये इन्वर्टर/ जनरेटरची सुविधा निर्माण करणे या दोन पायाभूत सोयीसुविधांसाठी अनुदानाचे प्रस्ताव पात्र अल्पसंख्याक शाळांना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात सादर करता येणार आहे. अनुदान योजनेतील या दोन पायाभूत सोयीसुविधांच्या प्रस्तावाबरोबर इतर आवश्यक सुविधांसाठी १० लाख रुपयांपर्यंतच्या मर्यादेत अनुदानाचे प्रस्ताव सादर करता येणार आहेत.

राज्य शासनाने प्रस्ताव प्राप्त करण्यासाठी सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत इच्छुक शाळांकडून २२ फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव स्वीकारण्यात येणार आहेत. त्यानंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. प्राप्त प्रस्तावांची जिल्हाधिकारी कार्यालयाकडून छाननी झाल्यांनंतर पात्र प्रस्ताव २८ फेब्रुवारीपर्यंत शासनास पाठविण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्व पात्र शाळांनी लवकरात लवकर आवश्यक कागदपत्रांसह सुधारित परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

# प्राध्यापक डी आर माळी यांना पत्रयोग जीवन गौरव पुरस्कार



**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र शासनाचा गुरु रविदास समाज भूषण पुरस्कार प्राप्त प्राध्यापक डी आर माळी यांना आपल्या पत्रकार च्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रश्न मांडून न्याय मिळण्यासाठी ज्यांनी आपली लेखणी झिजवली त्याबद्दल बुलढाणा जिल्हा पत्रकार संघातर्फे त्यांचा पत्रयोग जीवन गौरव पुरस्कार देऊन कामगार मंत्री आकाश फुंडकर व आमदार संजय कुटे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे होते या कार्यक्रमाला आमदार संजय भाऊ गायकवाड आमदार धीरज लिंगाडे आमदार मनोज आमदार सिद्धार्थ खरात यांच्यासह एबीपी माझाचे वृत्ती निवेदक प्रसन्न जोशी राधेश्यांडक इत्यादी मान्यवर व संपूर्ण जिल्ह्यातील पत्रकार उपस्थित होते या पुरस्काराबद्दल याप्रमाणे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.*

(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# पडद्यामागे काहीतरी मोठं घडतंय? धनंजय मुंडे अचानक अजित पवारांच्या भेटीला, प्रफुल्ल पटेलही देवगिरीवर दाखल



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रसचे नेते तथा राज्याते अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे हे आज अचानक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीला गेले आहेत. अजित पवार यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी धनंजय मुंडे हे दाखल झाले आहेत. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास एक तासापासून चर्चा सुरु आहे. धनंजय मुंडे अचानक अजित पवारांच्या भेटीला का गेले आहेत? याचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. धनंजय मुंडे यांनी अचानक अजित पवारांची भेट घेतल्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे. विशेष म्हणजे धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या देवगिरी बंगल्यावर दाखल झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल हे देखील तिथे दाखल झाले आहेत. त्यामुळे अजित पवारांच्या निवासस्थानी घडामोडींना वेग आलेला बघायला मिळत आहे. तीनही नेत्यांमध्ये नेमके काय खल सुरु आहेत ते अद्याप गुलदस्त्यात आहेत. पण राज्यातील घडामोडी पाहता काहीतरी नव्या घडामोडींचे हे संकेत तर नाहीत ना? अशी चर्चा आता सुरु आहे. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड हा जेलमध्ये आहे. या प्रकरणी धनंजय मुंडे यांच्यावरही विरोधकांनी गंभीर आरोप केले आहेत. तसेच अनेकांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे धनंजय मुंडे यांच्याच पक्षाचे आमदार प्रकाश सोळंके यांनीदेखील आरोपांनंतर धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदातून दूर व्हावं, असं म्हटलं होतं.

पण आरोपांचं रान उठत असतानादेखील धनंजय मुंडे यांनी अद्याप राजीनामा दिलेला नाही. पण या प्रकरणात जो दोषी आढळेल त्याच्याबाबतीत हयगय केली जाणार नाही. त्याला सोडलं जाणार नाही, अशीदेखील भूमिका अजित पवार आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे.महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अनेक वेगवेगळ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. या दरम्यान धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या भेटीला गेले आहेत. एकीकडे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीगाठी घेत आहेत. दुसरीकडे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिल्लीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर शिंदेंच्या शिवसेनेच्या नेत्यांनी दिल्लीत शरद पवारांची भेटदेखील घेतली. तर बीडमध्ये संतोष देशमुख प्रकरणाचा तपास पुढे सरकत आहे. या सर्व घडामोडींदरम्यान धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या भेटीला गेले आहेत.

# नागपुरात मोठी दुर्घटना!

## एक्सप्लोझिव्ह कंपनीत भीषण स्फोट, दोन कामगारांचा अंत; मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता





**नागपूर :** नागपूरमधून मोठी दुर्घटना समोर येत आहे. जिल्ह्यातील काटोल तालुक्याच्या कोतवालबड्डी येथील कंपनीमध्ये मोठा स्फोट झाला आहे. एका खाजगी स्फोटक कंपनीत हा स्फोट झाला आहे. मात्र आगीचे कारण अद्याप समोर आलेले नाही. या भीषण आगीत दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

एशियन फायर वर्क्स नामक कंपनीत ही आग लागली. या कंपनीत फटाके बनविण्यात येतात. आग इतकी भीषण होती की, कंपनीचा काही भाग जळून खाक झाला आहे. दुपारी दोन वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली आहे. धक्कादायक म्हणजे परिसरातील जंगलापर्यंत देखील ही आग फोफावली. तर सुमारे २० किलोमीटरपर्यंत स्फोटांचे हादरे बसले आहेत. कंपनीतील छप्पर मजूरांवर निखळल्याने त्यांनी जीव गमावला आहे. मुनिश मडावी (वय ३४, रा. मंडळा, मध्यप्रदेश) आणि भुरा लक्ष्मण रजाक (वय २५, रा. सिवनी, मध्यप्रदेश) अशी मृत मजुरांची नावे आहेत. तर घनश्याम लोखंडे व सोहेल शेख, अशी जखमींची नावे आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन दल व आरोग्य सेवा टीम घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. दरम्यान, कंपनीतील सामान आगीत जळून खाक झाले आहे. यामुळे कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे. तर या दुर्घटनेतील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पोलिसांनी या घटनेचा पुढील तपास सुरु केला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# आधी गाडी पेटवली, नंतर स्वत:लाही...




**नागपूर:** गाडी पेटवून स्वत:लाही जाळून डोजर चालकाने आत्महत्या केली. ही थरारक घटना खापरखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत शनिवारी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. ललित सुखाराम वस्त्राने (रा. वॉर्ड क्रमांक तीन, खापरखेडा) असे मृतकाचे नाव आहे. कामाच्या तणावातून त्याने आत्महत्या केल्याचे सांगण्यात येते. ललितच्या आत्महत्येची चित्रफीत व्हायरल झाल्याने खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, खापरखेडा येथे नागपुरातील डॉक्टर मिश्रा यांचे पाच एकर परिसरात फार्महाउस आहे. तेथे अभिषेक जगने हा काम करतो. शनिवारी सकाळी अभिषेक हा फार्महाउसमध्ये जात होता. त्याला मोटारसायकल व इसम जळताना दिसला. त्याने पोलिस व अग्निशमन विभागाला माहिती दिली. माहिती मिळताच पोलिस व अग्निशमन विभागाचे जवान तेथे पोहोचले. पोलिसांनी मोटारसायकलच्या चेसिसच्या क्रमांकाच्या आधारे गाडीमालकाचे नाव शोधले.एमएच-४०-बीए-७८९५ या क्रमांकांची मोटारसायकल ललितच्या मालकीचे असल्याचे समोर आले. सकाळी ललित हा गाडी घेऊन तेथे आला. त्याने गाडी जाळली. त्यानंतर अंगावर पेट्रोल टाकून स्वत:लाही पेटवून घेतले. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ललित हा एकटाच घटनास्थळाकडे जाताना दिसत आहे. यात्प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. त्याच्यापश्चात पत्नी व दोन मुले आहेत.ललित हा खापरखेडा वीज केंद्रात डोजर ऑपरेटर होता. गेल्या तीन दिवसांपासून तो कामावर गेला नव्हता. दारू पिऊन डोजर चालविताना तो पकडला गेल्या होता. त्यामुळे मालकाने त्याला कामावर येण्यास मनाई केली होती. याबाबत तो पोलिसांतही तक्रार करणार होता. तसेच पत्नीशीही त्याचा वाद झाला होता. त्याने आत्महत्येचा विचार पत्नीकडे बोलून दाखविला होता. कामाच्या तणावातून त्याने आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती आहे.

# मोबाईलवर तासनतास गप्पा, मग अचानक नर्सची विवस्त्र अवस्थेतील बॉडी सापडली....

**छत्रपती संभाजीनगर:** गेल्या १० दिवसांपासून एक महिला बेपत्ता होती. अखेर पोलिसांनी या बेपत्ता महिला प्रकरणाचा छडा लावला आहे. यावेळी एक अत्यंत धक्कादायक अशी घटना समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लासूर येथे एका तरुणाने विवाहित महिलेची हत्या करुन तिला विवस्त्र करत तिचा मृतदेह पुरला. गेल्या ६ फेब्रुवारीपासून ही महिला बेपत्ता होती. त्यामुळे तिच्या कुटुंबीयांनी ती बेपत्ता असल्याची तक्रार पोलिसात दाखल केली होती. तेव्हापासून पोलीस तिचा शोध घेत होते. पण तिचा काही थांगपत्ता लागत नव्हता. अखेर शुक्रवारी (१५ फेब्रुवारी) पोलिसांनी या घटनेचं गूढ उकललं आहे. प्रियकरानेच या विवाहित महिलेची हत्या केल्याचं समोर आलं आहे. मोनिका असं या विवाहितेचं नाव आहे. मोनिका या छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या आयुष्यमान भारत या




रुग्णालयात परिचारिका म्हणून काम करत होत्या. त्या जालना येथे राहत होत्या. त्या दररोज कामानिमित्त संभाजीनगर येथे ये-जा करायच्या. त्यासाठी त्या रेल्वे स्थानकापर्यंत दुचाकीने यायच्या. रेल्वे स्थानकाबाहेरील पार्किंगमध्ये त्या आपली गाडी पार्क करायच्या. यादरम्यान त्या पार्किंगमध्ये काम करणाऱ्या इरफान शेखसोबत त्यांची ओळख झाली आणि त्याचं रुपांतर प्रेमात झालं. गेल्या वर्षभरापासून यांचं प्रेमप्रकरण सुरु होतं. हे दोघे तासनतास फोनवर बोलायचे, अशी माहिती आहे.६ फेब्रुवारीला मोनिका या नेहमीप्रमाणे संभाजीनगर येथे कामावर जाण्यासाठी घरातून निघाल्या होत्या. पण, रात्री त्या घरी परतल्याच नाहीत. त्यामुळे मोनिका यांच्या आईने पोलिसांत धाव घेतली आणि त्या बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. तब्बल १० दिवस मोनिका यांचा शोध सुरु होता.यादरम्यान, पोलिसांना इरफान शेख याच्यावर संशय आला. पोलिसांनी चौकशीसाठी त्याला ताब्यात घेतलं. जेव्हा पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली तेव्हा त्याने या हत्येची कबुली दिली. आरोपी शेखने मोनिका यांना लासूर येथील आपल्या शेतात नेलं आणि तिथेच त्यांची हत्या केली. त्यानंतर त्याने शेतातील एका पडक्या खोलीत विवस्त्र करुन मोनिकाचा मृतदेह पुरला.
पोलिसांच्या तपासात शेखने मोनिकाच्या हत्येची कबुली दिली. तसेच, तिची हत्या करुन तिला कुठे पुरलं हेही सांगितलं. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळ गाठून मोनिका यांचा मृतदेह ताब्यात घेतला. सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# तव्यावर साचलाय काळा थर? घासायचा आलाय कंटाळा?

## एक रुपयाची मेहनत न घेता मिनटात होईल पांढराशुभ्र, वापरा ही सोपी ट्रिक

दररोजच्या स्वयंपाकात तव्याचा वारंवार वापर होतो. पोळ्या, पराठे, डोसे यांसारख्या पदार्थांसाठी तवा लागतोच लागतो. मात्र, सततच्या वापरामुळे तव्यावर चिकटसर पदार्थ, तेलाचे थर आणि जळकट डाग निर्माण होतात, ज्यामुळे तो काळवंडतो आणि स्वच्छ करणे कठीण होते. अनेक वेळा केवळ साबण आणि पाणी वापरून तवा स्वच्छ करता येत नाही. त्यासाठी काही सोपे आणि प्रभावी घरगुती उपाय वापरल्यास तवा नव्यासारखा स्वच्छ करता येतो. या लेखात आपण अशाच काही घरगुती आणि प्रभावी पद्धती जाणून घेणार आहेत, ज्या वापरून तुम्ही तुमचा तवा सहज स्वच्छ करू शकता आणि तो दीर्घकाळ टिकवू शकता.

### मीठ आणि लिंबाचा वापर

तव्यावर चिकटलेले पदार्थ आणि जळकटपणा काढण्यासाठी मीठ आणि लिंबाचा उपयोग अत्यंत प्रभावी ठरतो. यासाठी तव्यावर थोडेसे मीठ टाका आणि अर्धा लिंबू कापून त्याने तवा चोळा. लिंबातील नैसर्गिक ॲसिड आणि मिठाचा खडबडीतपणा एकत्र येऊन तव्यावरील सर्व घाण सहज काढतो. ५-१० मिनिटे हा उपाय करून नंतर कोमट पाण्याने







तवा स्वच्छ धुवा. हा उपाय तवा चमकदार आणि स्वच्छ करण्यासाठी प्रभावी आहे.

### व्हिनेगर आणि बेकिंग सोडा

जर तवा फारच काळा पडला असेल आणि त्यावर जळकट थर साठले असतील, तर व्हिनेगर आणि बेकिंग सोडाचा उपाय अत्यंत फायदेशीर ठरतो. यासाठी तव्यावर व्हिनेगर टाका आणि त्यात थोडेसे बेकिंग सोडा मिसळा. काही मिनिटांनी हे मिश्रण तव्यावर स्क्रबरच्या मदतीने घासा आणि नंतर कोमट पाण्याने स्वच्छ धुवा. हा उपाय तव्यावरील सर्व प्रकारच्या डागांना आणि चिकटसर थरांना दूर करतो

### कोळशाचा किंवा राखेचा वापर

पूर्वीच्या काळात तवा स्वच्छ करण्यासाठी कोळसा किंवा चुलीतील राख वापरण्यात येत असे. हा एक पारंपरिक उपाय असून तो आजही तितकाच प्रभावी आहे. तव्यावर थोडीशी राख किंवा बारीक केलेला कोळसा टाका आणि ओल्या स्क्रबने तवा चोळा. यामुळे तव्यावरील तेलकटपणा, जळकट डाग आणि चिकटलेले पदार्थ सहज निघून जातात. हा उपाय खास करून लोखंडी तव्यांसाठी अधिक उपयुक्त आहे.

### हळद आणि आंबट ताक

आंबट ताक आणि हळद हे स्वच्छतेसाठी प्रभावी घटक आहेत. तव्यावर आंबट ताक टाका आणि त्यात थोडीशी हळद मिसळून स्क्रबने चोळा. ताकातील लॅक्टिक ॲसिड मळ आणि चिकटपणा सोडवतो, तर हळद बॅक्टेरिया नष्ट करण्यास मदत करते. हा उपाय तव्यावरील वाईट वास दूर करण्यासाठी देखील उपयोगी आहे. साबणाच्या ऐवजी नैसर्गिक पद्धत वापरा साबण वापरल्याने काही वेळा तव्यावर रासायनिक अवशेष राहतात, जे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात. त्यामुळे तवा स्वच्छ करताना नैसर्गिक पद्धती वापरणे अधिक चांगले ठरते. गरम पाण्यात मीठ, लिंबू, किंवा बेकिंग सोडा मिसळून त्याने तवा धुतल्यास तो केवळ स्वच्छच होत नाही, तर त्याची चमकही टिकून राहते. तवा स्वच्छ ठेवणे ही केवळ स्वयंपाकघराच्या स्वच्छतेसाठीच नव्हे, तर आरोग्यासाठीही महत्वाची गोष्ट आहे. जळकट पदार्थ आणि तेलकट थर तव्यावर राहिल्यास त्याचा परिणाम अन्नाच्या चवीवर आणि आरोग्यावर होऊ शकतो. त्यामुळे वरील सोपे आणि घरगुती उपाय अवलंबून तवा स्वच्छ ठेवावा. योग्य काळजी घेतल्यास तवा अधिक काळ टिकतो!

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महाकुंभात स्नान, अयोध्येला जाताना भीषण अपघात; नांदेडमधील माय-लेकासह चौघांचा मृत्यू, १६ जखमी...

**नांदेड:** उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील लोणी कटरा पोलीस स्टेशन हद्दीतील रस्त्यावर नादुरुस्त स्थितीत उभ्या असलेल्या बसवर महाराष्ट्रातून कुंभमेळ्यात स्नान करुन अयोध्येला जाणारी एक टेम्पो ट्रॅव्हलर बस आदळून अपघात झाला. या अपघातात एकूण चार जणांचा मृत्यू झाला आहे, यातील तिघेजण नांदेडचे तर एक हिंगोली जिल्ह्यातील आहे. आज सकाळी साडेपाच वाजता कुंभमेळ्यात स्नान करुन नांदेड व परिसरातील काही मंडळी अयोध्येकडे रामलल्लाच्या दर्शनासाठी जात होते. सदरची मंडळी टेम्पो ट्रॅव्हलरने जात होती. तेंव्हा उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील लोणी कटरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पूर्वांचल एक्सप्रेस रोडवर रोडच्या बाजूला नादुरुस्त स्थितीत उभ्या असलेल्या या बसवर भरधाव वेगाने ही टेम्पो ट्रॅव्हलर आदळली. त्यामुळे झालेल्या अपघातात एकूण चार जण मृत्यूमुखी पडले आहेत. तर उर्वरित १६ जण जखमी झाले आहेत. या चार जणांमध्ये तीन जण नांदेडचे असून, एक जण हिंगोली जिल्ह्यातील असल्याचे वृत्त आहे. सुनिल दिगंबरराव वरपडे (५०) छत्रपती चौक नांदेड, अनुसया दिगंबर वरपडे (८०) रा. छत्रपती चौक नांदेड, दिपक गणेश गोदले स्वामी (४०) रा. छत्रपती चौक नांदेड, जयश्री कुंडलिकराव चव्हाण (५०) रा.आडगाव रंजेबुवा ता.वसमत जि.हिंगोली अशी या मृत व्यक्तींची नावे आहेत. या अपघातात सोळा जण जखमी असून, त्यांच्या संपर्कात नांदेड पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासन असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली. मृतांच्या शवविच्छेदनानंतर



त्यांचे मृतदेह नांदेडकडे आणण्यासाठी पोलीस प्रयत्न करत असून, कदाचित उद्यापर्यंत हे मृतदेह नांदेडला येतील, अशी शक्यता आहे. कुंभमेळ्यातील स्नानासाठी काही मंडळींनी एकत्र येवून सदरची टेम्पो ट्रॅव्हलर बुक केली होती. कुंभमेळ्याचे स्नान आटोपल्यानंतर ही मंडळी अयोध्येकडे रवाना होत होती. त्याचवेळी हा अपघात घडला. या टेम्पो ट्रॅव्हलरमध्ये २३ यात्रेकरु असल्याची माहिती प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे. जखमींची नावे अद्याप अप्राप्त आहेत

# भारतीय संघाला मोठा झटका; टीममधील आणखी एका खेळाडूला गंभीर दुखापत



**मुंबई:** युवा सलामीवीर यशस्वी जयस्वालसंदर्भात वाईट बातमी समोर आली आहे. यशस्वीच्या गुडघ्याला दुखापत झाली आहे आणि यामुळे तो रणजी ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत खेळू शकणार नाही. मुंबई संघ विदर्भाविरुद्ध उपांत्य सामना खेळेल. यशस्वीची अनुपस्थिती संघासाठी मोठा धक्का आहे. यशस्वीला चॅम्पियन्स ट्रॉफीच्या मुख्य संघातून आधीच वगळण्यात आले आहे. तर त्याला राखीव खेळाडूंमध्ये ठेवण्यात आले आहे. गरज पडल्यास त्याला चॅम्पियन्स ट्रॉफीमधूनही बोलावले जाऊ शकते. आता रणजीमधून वगळल्यामुळे त्याच्या अडचणी वाढल्या आहेत. २३ वर्षीय यशस्वी जयस्वालच्या डाव्या गुडघ्याला वेदना होत आहेत. त्यामुळे तो विदर्भाविरुद्ध खेळू शकणार नाही. तो त्याच्या दुखापतीची तपासणी करण्यासाठी बेंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमी (एनसीए) मध्ये जाईल. यशस्वीची दुखापत मुंबईसाठी मोठा धक्का आहे. संघात अजिंक्य रहाणे आणि शिवम दुबे सारखे अनुभवी खेळाडू आहेत. शार्दुल ठाकूरही चांगल्या फॉर्ममध्ये आहे पण संघाला यशस्वीच्या आक्रमक फलंदाजीची उणीव भासेल. रणजी उपांत्य फेरी १७ फेब्रुवारीपासून नागपूरमध्ये सुरू होईल. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी जानेवारीमध्ये जाहीर झालेल्या संघात यशस्वी जयस्वालला स्थान मिळाले. पण नंतर त्याच्या जागी मिस्ट्री स्पिनर वरुण चक्रवर्तीला संघात स्थान देण्यात आले. यशस्वी आता शिवम दुबे आणि मोहम्मद सिराजसह नॉन-ट्रॅव्हलिंग राखीव खेळाडू आहे. म्हणजे ते संघासोबत जाणार नाहीत, पण गरज पडल्यास त्यांना बोलावता येईल. यशस्वीने नुकतेच इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्यात पदार्पण केले. तो त्या सामन्यात काही खास कामगिरी करू शकला नाही.यशस्वी जयस्वालने आतापर्यंत भारतासाठी १९ कसोटी आणि २३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. यामध्ये त्याच्या नावावर २००० हून अधिक धावा आहेत. त्याने कसोटी सामन्यात सुमारे ५३ च्या सरासरीने १७९८ धावा केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय टी मध्ये त्याची सरासरी ३६ आहे आणि स्ट्राईक रेट १६४ आहे. त्याने या फॉरमॅटमध्ये ७२३ धावा केल्या आहेत.

# रोहित शर्माला चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तानात जावं लागणार का?

**नवी दिल्ली :** भारतीय संघ पाकिस्तानात जाणार नाही, हे तर निश्चित आहे. पण भारताचा कर्णधार रोहित शर्माला पाकिस्तानने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या ओपनिंग सेरेमनीसाठी आमंत्रण पाठवले आहे. त्यामुळे रोहित शर्माला पाकिस्तानमध्ये जावं लागणार की नाही, याबाबत आता आयसीसीची नियम समोर आला आहे. आयसीसीच्या नियमानुसार रोहित शर्मा पाकिस्तानमध्ये जावं लागणार की नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. पाकिस्तानने आयसीसीला सांगितले आहे की, इ्ड्ड स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वी चॅम्पियन्स ट्रॉफीची ओपनिंग सेरेमनी होणार आहे. या कार्यक्रमासाठी सर्व देशांच्या कर्णधारांना आमंत्रित करण्यात आले आहे. यावेळी सर्व कर्णधार चॅम्पियन्स ट्रॉफीबरोबर फोटोशूट करतील. त्यामुळे भारतीय संघ जरी पाकिस्तानात येणार नसला तरी या कार्यक्रमासाठी रोहित शर्माला आम्ही आमंत्रित करत आहोत.

**बीसीसीआयचे काय म्हणणे आहे...**

बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी याबाबत म्हटले आहे की, आम्ही पाकिस्तानात एकही सामना खेळणार नाही. आमचे सर्व सामने हे दुबईत होणार आहे. त्यामुळे रोहित शर्माचा पाकिस्तानमध्ये जाण्याचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे रोहित शर्माला आम्ही पाकिस्तानमध्ये पाठवणार नाही. पण बीसीसीआयने जरी असे म्हटले असले तरी त्यांना आयसीसीच्या नियमांचे पान करावे लागणार आहे

**आयसीसीचा नियम आहे तरी काय...**

आयसीसी आपल्या सर्व स्पर्धांसाठी नियम बनवत असते. स्पर्धेच्या सुरुवातीपासून ते अखेरपर्यंत आयसीसीचे सर्व नियम ठरलेले असतात. त्यानुसार चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन हे पाकिस्तानाच होणार आहे. पाकिस्तान या स्पर्धेची यजमान आहे. त्यामुळे त्यांच्या देशातच ओपनिंग सेरेमनी होणार आहे. यासाठी सर्व कर्णधारांना जाणे बंधनकारक असते. त्यामुळे रोहित शर्मालाही या कार्यक्रमात जावे लागणार आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वी पाकिस्तानमध्ये ओपनिंग सेरेमनीचे आयोजन केले आहे. त्यासाठी आता सर्व कर्णधार पाकिस्तानमध्ये दाखल होणार आहेत. त्यामुळे आयसीसीच्या नियमानुसार रोहित शर्मालाही पाकिस्तानमध्ये जावे लागणार आहे. पण आता बीसीसीआय काय करणार, रोहितला पाकिस्तानमध्ये पाठवणार की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नराधमाला ४ वर्षांच्या चिमुरडीवर दया आली नाही, अमरावतीत चिड आणणारी घटना....



**अमरावती:** गेल्या काही काळापासून राज्यात लहान मुलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पोलिस प्रशासन त्या दिशेने पाऊल उचलत असले तरी गुन्हेगारांमध्ये त्यांचा काही धाक नसल्याचं दिसून येत आहे. त्याचं कारण म्हणजे, अमरावतीत एक अत्यंत चिड आणणारी आणि संतापजनक घटना घडली आहे. येथे एका चार वर्षांच्या चिमुकलीवर एका नराधमाने अतिप्रसंग केला आहे. हा एक कुख्यात आरोपी असून नुकताच तुरुंगातून सुटून आल्याची माहिती आहे. या घटनेने अमरावतीत संतापाची लाट उसळली आहे.

अमरावती शहरापासून जवळच असलेल्या एका गावात अवघ्या चार वर्षीय चिमुरडीवर एका नराधमाने अतिप्रसंग केला आहे. या चिमुकल्या पोरीला रात्री घरातून उचलून नेऊन तिच्यावर या नराधमाने अतिप्रसंग केला. त्याप्रकरणी पोलिसांनी बुधवारी (१२ फेब्रुवारी) पहाटे त्या नराधमाच्या मुसक्या आवळल्या आहेत. विशेष म्हणजे सदर आरोपी हा दोन ते तीन दिवसांपूर्वीच कारागृहातून शिक्षा भोगून परतला होता, अशी माहिती आहे.राजेश भाऊराव मरकाम ( वय वर्ष२३) असे त्या नराधमाचे नाव आहे. तो नुकताच एका गुन्ह्यातून अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहातून सुटून घरी आला होता. मंगळवारी (११ फेब्रुवारी) रात्री पीडित चिमुकली आणि तिचे आई-वडील झोपेत असताना, त्यांच्या घरातून राजेशने चिमुकलीला उचलून नेले. त्याने गावानजीक असलेल्या जंगलात तिच्यावर अतिप्रसंग केला. यादरम्यान तिच्या पालकांना जाग आली असता, चिमुकली घरात न दिसल्याने त्यांनी तत्काळ मोर्शी पोलिसांकडे धाव घेतली.मोर्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी खांडेकर यांच्या मार्गदर्शनात साहाय्यक पोलीस निरीक्षक वाघ, पोलीस उपनिरीक्षक शिवराज पवार, तुषार चव्हाण, अमोल बुरकूल, विशाल रोकडे व डीबी स्कॉडचे स्वप्निल बायस्कर, छत्रपती करपते, मंगेश श्रीराम, योगेश सांबारे यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन जंगलात शोध घेतला. त्यावेळी ही बालिका रडत असताना आढळून आली. घडलेली घटना पाहून सारेच हादरले. पोलिसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेतला असता, आरोपी जंगलातच लपून बसलेला होता. पोलिसांनी त्याला अटक केली असून पुढील तपास सुरु आहे.

# क्रिकेटप्रेमींची प्रतिक्षा अखेर संपली, १० संघ, १३ शहर, ७४ सामने; आयपीयलचे २०२५ चे वेळापत्रक जाहीर...

**मुंबई:** इंडियन प्रीमियर लीग म्हणजेच आयपीएल ही जगातील सर्वात लोकप्रिय टी-२० लीग आहे. केवळ भारतातच नाही तर जगभरातील क्रिकेट चाहते इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ची आतुरतेने वाट पाहत असतात. आयपीएलचा आगामी हंगाम पुढील महिन्यापासून सुरू होणार आहे. याआधी आयपीएल २०२५ बाबत एक मोठा खुलासा झाला आहे. आयपीएल २०२५ चे वेळापत्रक जाहिर झाले आहे.

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) चा १८ वा हंगाम २२ मार्च रोजी गतविजेता कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) यांच्यातील सामन्याने सुरु होईल. यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे २३ मार्च रोजी दोन सामने खेळवले जातील. पहिला सामना २३ मार्च रोजी सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळला जाईल. यानंतर, दुसरा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात संध्याकाळी ७:३० वाजता खेळला जाईल. या हंगामात लीग टप्प्यात चेन्नई आणि मुंबईमध्ये दोनदा आमनेसामने येतील. त्याच वेळी, ७ एप्रिल रोजी आरसीबी आणि मुंबई यांच्यात फक्त एकच लीग सामना खेळला जाईल. हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे.

आयपीएल २०२५ चा अंतिम सामना २५ मे रोजी खेळला जाईल. सुरुवातीचे आणि अंतिम सामने दोन्ही कोलकात्यातील ईडन गार्डन्स येथे होतील. या लीगचे आयोजन १३ ठिकाणी केलेले आहे.

आयपीएल २०२५ मध्ये ६५ दिवसांत एकूण ७४ सामने खेळवले जातील. आयपीएल २०२५ मध्ये, लीग सामने २२ मार्च ते १८ मे दरम्यान खेळवले जातील. यानंतर, २०, २१, २३ आणि २५ मे रोजी



प्लेऑफ सामने आयोजित केले जातील.

आयपीएल २०२५ चे सामने १३ शहरांमध्ये खेळवले जातील

आयपीएलच्या १८ व्या हंगामाचे सामने एकूण १३ शहरांमध्ये खेळवले जातील. आयपीएल २०२५ चे सामने लखनौ, मुंबई, हैदराबाद, चेन्नई, अहमदाबाद, विशाखापट्टणम, गुवाहाटी, बेंगळुरू, न्यू चंदीगड, जयपूर, दिल्ली, कोलकाता आणि धर्मशाळा येथे खेळवले जातील. आयपीएल २०२५ मध्ये एकूण १२ डबल हेडर सामने आहेत. याचा अर्थ असा की दिवसातून १२ वेळा दोन सामने खेळवले जातील.

दरवर्षी आयपीएलचा पहिला सामना मागील हंगामाचा अंतिम सामना खेळणाऱ्या दोन संघांमध्ये खेळला जातो, परंतु यावेळी तसे होत नाही. गेल्या हंगामाच्या म्हणजेच आयपीएल २०२४ च्या अंतिम सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद आमनेसामने आले होते, परंतु आयपीएल २०२५ चा पहिला सामना केकेआर आणि आरसीबी यांच्यात खेळला जाईल.

# आपला मराठी सिनेमा व्हेंटिलेटरवर आहे संतोष जुवेकरचं परखड मत चर्चेत.!



**मुंबई** - सध्या सर्वत्र विकी कौशलच्या छावा सिनेमाची चर्चा आहे. हा सिनेमा १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रदर्शित झाला असून एका दिवसात या सिनेमाने प्रेक्षकांचे मन जिंकलंय. छावा सिनेमाला प्रेक्षकांची पसंती मिळतेय आणि हा सिनेमा हाऊसफुल ठरतोय. छावा सिनेमामध्ये अनेक कलाकारांची मांदियाळी असून या सिनेमामध्ये मराठी अभिनेतेसुद्धा झळकले आहेत. मराठी अभिनेता संतोष जुवेकरसुद्धा छावा सिनेमामध्ये झळकतो आहे. अशातच आता एका मुलाखतीदरम्यान संतोषने मराठी सिनेमांबद्दल वक्तव्य केलं आहे. आजकाल मराठी सिनेमांना फारशी गर्दी होताना दिसत नाही. अनेक मराठी सिनेमांना थिएटरच मिळत नाही. त्यामुळे सिनेमे प्रदर्शित होऊनही लगेच फ्लॉप होतात. अनेक मराठी कलाकार याबद्दल भाष्य करत असतात. संतोष जुवेकरनेसुद्धा या संदर्भात भाष्य केलंय.संतोष जुवेकर छावा सिनेमामुळे चर्चेत आला आहे. तो सिनेमाच्या प्रमोशनसाठी अनेक माध्यमांना मुलाखती देत आहे. संतोषने इट्स मज्जाला नुकत्याच दिलेल्या मुलाखतीमध्ये मराठी सिनेमांबद्दल केलेलं वक्तव्य चर्चेत आलं आहे. संतोष जुवेकर म्हणाला की, कोणीच वाईट चित्रपट बनवायचा म्हणून बनवत नाही. प्रत्येक व्यक्ती आपल्या परीनं चांगलाच चित्रपट बनवण्याचा प्रयत्न करते. आपल्याकडे बजेटच नाही. आपण एखादा चार कोटींपर्यंतचा चित्रपट करायचा ठरवला तरी लोकांना वाटतं की, या चित्रपटातून नफा कसा मिळणार?नफा अजिबात मिळालाच नाही, तर काय करणार? त्यामुळे मला वाटतं की, आपला मराठी सिनेमा व्हेंटिलेटरवर आहे. काही दिवसांनी मला नाही वाटत की, मराठी सिनेमा बनेल. असं संतोषने पुढे म्हटलं आहे.दरम्यान, छावा या चित्रपटाने एका दिवसातच कोट्यवधी रुपयांची कमाई केली. ङ्गछावाफ रेकॉर्डब्रेक कमाई करणार असं म्हटलं जातंय. त्याचबरोबर विकी कौशलने छत्रपती संभाजी महाराज यांची भूमिका साकारत प्रेक्षकांना थक्क केलंय. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी इतिहास रुपेरी पडद्यावर पुन्हा एकदा जिवंत केला. या सिनेमाने दुसऱ्या दिवशी ३६.५ कोटींची कमाई केली आहे. यामुळे दोन दिवसांत चित्रपटाची कमाई ६७.५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. पहिल्या दिवशी चित्रपटाने जगभरात ५० कोटी रुपये कमावले होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भाजपा नेते महाराष्ट्र माजी मंत्री आमदार डॉ.संजयजी कुटे साहेब यांनी घेतला बुलढाणा विधानसभा मतदारसंघ भाजपा प्राथमिक सदस्य नोंदणी चा आढावा.

## नुकतेच भाजपा मध्ये प्रवेश घेतलेल्या मान्यवरांचा भाजपा बुलढाणा तर्फे सत्कार

**जनसंचलन/बुलढाणा**

भाजपा नेते महाराष्ट्र माजीमंत्री आमदार डॉ.संजयजी कुटे साहेब यांनी भाजपा बुलढाणा जनसेवा कार्यालय येथे आयोजित बैठकीत बुलढाणा शहरातील भाजपा प्राथमिक सदस्य नोंदणी चा आढावा भाजपा पदाधिकारी यांच्या कडून घेतला यावेळी भाजपा बुलढाणा विधानसभा प्रमुख मा.योगेंद्रजी गोडे साहेब यांच्या नेतृत्वात बुलढाणा विधानसभेत १७२०० नोंदणी झाली असल्याचा आढावा उपस्थित पदाधिकारी कार्यकर्ते यांनी दिला. तसेच सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांना आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी मार्गदर्शन आमदार डॉ. संजयजी कुटे साहेब यांनी केले.याच वेळी नुकतेच भाजपा मध्ये प्रवेश घेतलेले माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेशभाऊ सिनकर,माजी शिवसेना शहर प्रमुख मुन्नाजी बेंडवाल,माजी शिवसेना शहर प्रमुख नारायणजी हेलगे,मल्हार संघटने चे नंदू भाऊ लवंगे यांचा भाजपा बुलढाणा विधानसभा प्रमुख मा.योगेंद्रजी गोडे साहेब यांच्या मार्गदर्शनात भाजपा बुलढाणा पदाधिकारी कार्यकर्ते तर्फे सत्कार करण्यात आला याप्रसंगी मंचावर भाजपा नेते बुलढाणा सिद्धार्थ भैय्या शर्मा,भाजपा जिल्हा उपाध्यक्षा विजयाताई राठी,भाजपा जिल्हा सचिव बाळासाहेब गीऱ्हे, नगरसेवक गोविंदरावजी सराफ उपस्थित होते या बैठकीला माजी जिल्हा सचिव बाबासाहेब वरनगावकर,माजी शहर सरचिटणीस आशिषजी व्यवहारे,भाजपा युवा मोर्चा जिल्हा महामंत्री सोहमजी झाल्टे,भाजपा अल्पसंख्याक आघाडी शहराध्यक्ष आसिफभाई,माजी सैनिक अशोकजी किलबिले,भाजपा शहर उपाध्यक्ष हर्षलजी जोशी,सचिनजी टेंभिकर,वैभवजी इंगळे,नितीनजी दासर,दत्ताभाऊ जेऊघाले,प्रदीपजी बेगानी,भाजपा जैन प्रकोष्ट सोशल मिडिया प्रदेशाध्यक्ष तेजस भंडारी,प्रदीपजी सोनटक्के,नितीनजी श्रीवास,मोहित भंडारी,प्रितेशजी बेदमुथा,सचिनजी जोशी,आदित्य उदयकार,महेश तलवारे,अथर्व, टाकळकर,अक्षयजी



छाजेड, अमानुल्ला खान,सर्जेरावजी देशमुख,विजयजी भुसारी,किरणजी तायडे,पंजाबराव गाढे, यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बालाजी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीत कोट्यावधींचा घोटाळा!

**जनसंचलन/बुलढाणा**

बालाजी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या शाखेत बनावट सोने तारण ठेवून ५९ लाखांचे कर्ज घेतल्याची घटना चव्हाट्यावर आली आहे.हा कोट्यावधींचा घोटाळा असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात व शहरात बँका, पतसंस्था आणि फायनान्स कंपन्यांचे मोठे जाळे आहे. कर्जापोटी सील केलेली मालमत्ता बेकायदेशीरपणे ताब्यात घेणे, चोरीचे सोन्याचे दागिने तारण ठेवून कर्ज उचलणे असे गुन्हे या आर्थिक क्षेत्राला नवीन नाहीत. अशा परिस्थितीला तोंड देत बुलढाणा जिल्ह्याची आर्थिक वाट सुलभ होत असताना आता बँका, पतसंस्था आणि फायनान्स कंपन्यांपुढे नवी गुन्हेगारी समस्या पुढे राहिली आहे. आता बनावट सोने तारण ठेवून त्यावर कर्ज उचलले जात आहे. त्यासाठी सराफ सोन्याची शुद्धतेची नजर अंदाज बांधून बँका, फायनान्स कंपन्या व पतसंस्थांना तसा दाखला देतात. त्यावर संस्था कर्जदाराला सोन्याच्या सुमारे ७० ते ८० टक्के देऊन १० ते २० टक्क्यांपर्यंत आकारणी करतात. मात्र फसवणूक करणाऱ्या टोळींकडून नामीशक्कल लढवत बँका, फायनान्स कंपन्या व पतसंस्थांना लुटले जात आहे. असा साखरखेर्डा येथे फसवणुकीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर मात्र सराफ व्यावसायिकांची कोंडी झाली आहे. बनावट सोने तारण ठेवणाऱ्या या टोळ्यांमळे अनेकजण अडचणीत येऊ शकतात. साखरखेर्डा येथील बालाजी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या शाखेत कथित स्तरावर सराफाच्या संगनमताने बनावट सोने तारण ठेवून चार जणांनी ५९ लाख २७ हजार ५०० रुपये कर्ज घेतल्याचा प्रकार या संदर्भात पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून समोर आला आहे. दरम्यान,२५ लाखांवरील रकमेचे हे प्रकरण असल्याने त्याचा तपास प्रसंगी आर्थिक गुन्हे शाखेकडे दिला जाऊ शकतो. परंतु, अद्याप या प्रकरणात साखरखेर्डा पोलिसात गुन्हा दाखल झालेला नाही. प्रकरणी पतसंस्थेचे जनरल मॅनेजर, अनि गाडे यांनी १४ फेब्रुवारीला साखरखेर्डा पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.बालाजी सोसायटीच्या साखरखेर्डा शाखेने तारण सोन्याचे मूल्यांकन करण्यासाठी अजिंक्य दिलीप शहाणे या सराफाची नियुक्ती केली होती. शहाणे यांच्या माध्यमातून भगवान शहाणे, राजू कॅंधळे, गोपाल पाझडे आणि प्रदीप अवचार यांनी सोने तारण कर्ज घेतले होते. संतोष गाडेकर यांनी जिल्हा निबंधक कार्यालयाकडे तक्रार केली होती. दरम्यान बनावट सोन्याच्या न वजनातही तफावत आढळली. साखरखेर्डा शाखेत त्या कर्जदारांना उपस्थित राहण्यासाठी १२ फेब्रुवारी रोजी शेवटची नोटीस देण्यात आली. त्यानंतरही कर्जदारांसह मूल्यांकन करणारा शहाणे उपस्थित राहिला नाही. चिखली येथे जगदाळे यांनी केलेल्या मूल्यांकनात कर्जदारांचे सोने बनावट असल्याचे आढळून आले. त्याच्या वजनातही तफावत होती.या प्रकरणात बँकेच्या संचालकांच्या उपस्थितीत अहवाल तयार करण्यात आला होता.दरम्यान दोषींविरुद्ध कारवाईसाठी साखरखेर्डा पोलिस स्टेशनमध्ये तक्रार देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ठाणेदार गजानन करेवाड यांनी चौकशीअंती गुन्हा दाखल करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.तसेच प्रसंगी हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे दिले जाऊ शकते,असेही संकेत त्यांनी दिले.

# नियम तुडविणारी ३५ वाहने जमा!

**जनसंचलन/बुलढाणा**

वाहने सुसाट.. नियम चाकाखाली! कायदेशीरब्रेक कधी लागेल? असा प्रश्न हॅलो बुलढाणा ने काल शिव वाहतूक सेनेने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनच्या माध्यमातून उपस्थित केला होता.दरम्यान वृत्त प्रसारित होताच काल विनापरवाना आणि कागदोपत्री पूर्तता नसलेली ३५ अवैध वाहने पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली आहे. आज हा आकडा फुगण्याची शक्यता आहे. शिवसेना प्रणित शिव वाहतूक सेना ने जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यात विनापरवाना व कागदांची पूर्तता न केलेली वाहने सुसाट वेगाने धावत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढल्याचे म्हटले होते.वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र नसल्यास सदर वाहने शासन जमा करण्याची आग्रही मागणी करीत आंदोलनाचा इशारा ही दिला होता.याबाबत हॅलो बुलढाणा ने सर्वप्रथम सडेतोड वृत्त प्रसारित करून पोलीस यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. शिव वाहतूक सेनेने निवेदनात म्हटले होते की, बुलढाणा जिल्ह्यातील काळी-पिवळी, वाहतुक ऑटो रिक्शा, स्कुल बसेस व इतर बरेचशी वाहने विनापरवाना कागदोपत्री पुर्तता नसलेली वाहने सर्रास धावताहेत. अशा ब-याचशा वाहनांचे आजपर्यंत अपघात सुद्धा झालेले आहेत. त्यामध्ये अनेक नागरीकांची जिवीत हानी झाली.. कायम स्वरुपी अपंगत्व सुद्धा आलेले आहे.अशा वाहनांवर कुठल्याही प्रकारची कार्यवाही न करता सर्रास ही वाहने परत जिल्ह्यातील वाहतुकीसाठी रोडवर सुसाट वेगाने पळताहेत, या सर्व बाबींना जबाबदार जिल्ह्यातील परीवहन कार्यालयातील अधिकारी तसेच जिल्हा पोलीस वाहतुक कार्यालयातील सर्व वाहतुक कर्मचारी यांचे संगणमत असल्यामुळे हा प्रकार सर्रास सुरु असल्याचा आरोप शिव वाहतूक सेने ने केला होता. बुलढाणा आर. टी ओ,अधिकारी-कर्मचारी झोपेत आहे. व शहरातील ट्रॅफीक पोलीस यंत्रणा फक्त नावापुरत्या शासकीय ड्युट्या करीत असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला होता. येत्या २४ तासाच्या आत कारवाई करण्यात यावी,अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र उपोषण करण्यात येईल असा इशारा,शिव वाहतूक सेनेचे जिल्हाप्रमुख राजेश मुंगळे यांनी दिला होता.दरम्यान निवेदनाची व हॅलो बुलढाणा च्या वृत्ताची दखल घेण्यात येऊन ३५ वाहने जमा करण्यात आली आहे.

# आयुष्यभर झिजलेल्या लेखणीचा ऐतिहासिकसन्मान बुलढाण्यात पत्रयोगी जीवनगौरव पुरस्कार ठरला भावस्पर्शी.....

## केंद्रीय आणि राज्याचे मंत्रीसह जिल्ह्यातील आमदारांची उपस्थिती...

**जनसंचलन/बुलढाणा**

समाजहितार्थ पत्रकारिता करून आयुष्यभर लेखणी झिजविलेल्या पत्रकारांचा ऐतिहासिक सन्मान सोहळा आज, १६ फेबुवारी रोजी बुलढाण्यातील गर्दे वाचनालयाच्या सभागृहात सोत्साह पार पडला. पत्रकारितेप्रति सामाजिक कृतज्ञतेची जाणिव ठेवीत केंद्रीय मंत्री ना. प्रतापराव जाधव आणि राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी उपस्थिती दर्शविली. ६० वर्षे वयावरील ज्येष्ठ पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेते यांचा बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाकडून ङ्गपत्रयोगी जीवन पुरस्कारफ देवून सपत्नीक सन्मान करण्यात आला. जिल्ह्यातील आमदारांनी सोहळ्याला हजेरी लावून पत्रकारांच्या सामाजिक योगदानाचा यावेळी गौरव केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस सुरेश नाईकवाडे होते. सुप्रसिद्ध न्यूज विश्लेषक प्रसन्न जोशी यांची विशेष उपस्थिती होती. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय आयुष मंत्री खा. प्रतापराव जाधव, राज्याचे कामगार मंत्री आ.आकाश फुंडकर, आ. संजय कुटे, आ. संजय गायकवाड, आ. धीरज लिंगाडे, आ. मनोज कायंदे, आ. सिद्धार्थ खरात, मुख्यमंत्र्यांचे स्वीय सचिव विद्याधर महाले यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी गणेश पांडे, शहर ठाणेदार नरेंद्र ठाकरे, अकोला उपमुकाअ समाधान वाघ, नाशिक उपमुकाअ प्रताप पाटील, व्हिडीओ प्रॉडक्शन तज्ञ प्रथमेश गोगारी, माँ जिजाऊ अर्बनचे उपाध्यक्ष शिवाजीराव तायडे, आदिती अर्बनचे जनसंपर्क अधिकारी सुरेंद्र जाधव, यांची विशेष उपस्थिती होती. मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, परभणी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रभू दिपके,पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे समन्वयक राजेश डिडोळकर, डिजीटल मिडीया परिषदेचे राज्याचे अध्यक्ष अनिल वाघमारे, उपाध्यक्ष अनिल उंबरकर, केंद्रीय सदस्य जितेंद्र सिरसाठ, धम्मपाल डावरे आदि मान्यवरही मंचावर विराजीत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख यांनी केले. मागील दीड महिन्यात सिंदखेडराजापासून संग्रामपूरपर्यंत मराठी पत्रकार परिषद संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारिणीच्या जिल्हाध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी सूत्रसंचालन करत कार्यक्रमाचे महत्त्व विशद केले. कामगार मंत्री आमदार ॲड. आकाश फुंडकर, आ संजय गायकवाड, सिद्धार्थ खरात, बुलढाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक यांनी पत्रकारितेसमोरील आव्हाने आणि समाजात पत्रकारितेचे महत्त्व विशद केले. पत्रकारांच्या मागण्यांसाठी शासन स्तरावरून प्रयत्न करण्याचे ठोस आश्वासन ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. ङ्गपत्रकारांसाठी स्थापन करण्यात आलेल्या आर्थिक विकास महामंडळाच्या प्रशासकीय संरचनेचे काम अंतिम टप्प्यात असल्याचेही ते म्हणाले. ङ्गराजकीय नेते आणि पत्रकार यांच्या सहसंबंधांवर आ. संजय गायकवाड यांनी प्रकाश टाकला. पत्रकारांच्या मागण्या शासनाकडून पूर्ण करून घेण्यासाठी कटीबद्ध असल्याचेही ते म्हणाले. विद्याधर महाले यांनी मनोगतात म्हटले की, पत्रयोगी जीवन गौरव पुरस्कार खर्या अर्थाने ज्येष्ठ पत्रकारांच्या पत्रकारितेचा सन्मान आहे.

या सोहळ्यात जिल्ह्यातील ८७ ज्येष्ठ पत्रकारांचा आणि वृत्तपत्र वितरकांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. सन्मानचिन्ह, भेटवस्तू, शाल आणि पुष्पहार, महिलेसाठी साडी असे पुरस्काराचे स्वरूप होते. जिल्हाभरातून आलेल्या ज्येष्ठ पत्रकारांचा मान्यवरांनी गौरव केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पत्रकार संघाच्या कार्यकारिणीने विशेष मेहनत घेतली. जिल्ह्यातील पत्रकार बांधवांनी या सोहळ्याच्या आयोजन-नियोजन आणि संयोजनाचे कौतुक केले. कार्यक्रमाला यशस्वी बनविण्यासाठी कार्याध्यक्ष वसीम शेख अन्वर, कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख, सरचिटणीस कासिम शेख, प्रदेश प्रतिनिधी युवराज वाघ, गणेश निकम, उपाध्यक्ष रविंद्र गणेशे, सचिव शिवाजी मामनकर, महिला सेल अध्यक्ष कु. मृणाल सावळे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख किशोर खंदारे, सहप्रसिद्धी प्रमुख निनाजी भगत, जिल्हा संघटक प्रेमकुमार राठोड, जिल्हा समन्वयक पंजाबराव ठाकरे, आरोग्य सेल कार्याध्यक्ष डॉ. भागवत वसे, शाकिर हुसैन, विभागीय संघटक रहेमत अली, बुलढाणा शहर पत्रकार संघ कार्यकारिणीचे राम हिंगे, अजय राजगुरे, ईसरार देशमुख,सुनिल मोरे. समाधान चिंचोले, राहुल दर्डा, जफर शेख, सुधाकर मानवतकर, विनोद सावळे, रमेश जाधव, सैय्यद ईरफान, प्रकाश जेऊघाले, ओम कायस्थ आदिंनी विशेष परिश्रम घेतले. डिजीटल मिडीया परिषदेचे विभागीय सचिव जितेंद्र कायस्थ, सचिव दीपक मोरे यांनीही कार्यक्रमाला यशस्वी बनविण्यासाठी मेहनत घेतली. आभार प्रदर्शन अभिषेक वरपे यांनी केले.

**रेल्वे सवलत पुन्हा सुरु करण्यासाठी प्रयत्नशील : ना. जाधव**

यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी पत्रकारांच्या कल्याणासाठी केंद्र सरकारतर्फे पुढाकार घेत असल्याचे सांगितले. ते म्हणाले, कोरोना काळात रेल्वेने अनेक सवलती बंद केल्या होत्या. काही ठिकाणचे थांबेही बंद झाले होते. पत्रकारांसाठी रेल्वेसह विमान प्रवासात सवलत मिळावी यासाठी मी प्रयत्नशील राहील, असे ना. जाधव यांनी आश्वस्त केले. तसेच, आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून पत्रकारांच्या आरोग्य सेवेसाठीही विशेष योजना राबवली जाईल. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी पत्रकारांना रेल्वे सवलत पुन्हा सुरु करण्याची मागणी संचालनामधून केली होती, हे विशेष.

**नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार आवश्यक - प्रसन्न जोशी**



प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना प्रसन्न जोशी म्हणाले, पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपानुसार नव्या तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील पत्रकारांनी आपल्या उमेदीने दिल्लीतसुद्धा महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करावे. ग्रामीण भागातील पत्रकारांना येणार्या अडचणीवर त्यांनी प्रकाश टाकला. आजच्या पत्रकारितेसमोरील समस्यांवर भाष्य करत डिजिटल पत्रकारितेत कशा संधी आहेत यावरही त्यांनी मार्गदर्शन केले.

**जिल्हा पत्रकार संघाचा कौतुकास्पद उपक्रम - सुरेश नाईकवाडे**

मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस सुरेश नाईकवाडे यांनी बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले, ज्येष्ठ पत्रकारांचा सपत्नीक गौरव करणे ही अभिनव संकल्पना आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात पत्रकारांच्या हक्कासाठी लढा सुरू आहे. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाने राबवलेला हा विशेष उपक्रम इतर जिल्ह्यातही घेण्यात प्रोत्साहित करण्याबाबत त्यांनी स्पष्ट केले.

**लवकरच खामगाव जिल्हा : डॉ. संजय कुटे**

जिल्हा पत्रकार संघाच्या उपक्रमाचे कौतुक करून माझ्या वडिलांनीही वीस वर्ष पत्रकारिता केल्याचे हा संजय कुटे यांनी यावेळी सांगितले. २०१७ मध्ये खामगाव हा नवीन जिल्हा होईल, अशी माहिती आमदार संजय कुटे यांनी दिली

## स्मशानभूमी ठरतेय पक्ष्यांसाठी आधारवड

**जनसंचलन/किनगाव जट्टू**

उन्हाळ्याची चाहूल लागल्याने पाणी आणि अन्नासाठी भटकणाऱ्या किनगाव जदूतील दोन तरुणांनी स्मशानभूमीत पक्षी उपाहारगृह सुरू करून एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. विनोद सातपुते आणि राजू नागरे या दोन युवकांनी पक्ष्यांना पाणी आणि अन्नधान्य सहज उपलब्ध व्हावे, म्हणून झाडांवर प्लास्टिकच्या भांड्यांमध्ये पाणी आणि अन्नधान्य टाकण्याची व्यवस्था केली. सध्या उन्हाळा तीव्र होत असून, पाण्याअभावी अनेक लहान पक्ष्यांना जीव गमवावा लागतो. किनगाव जदूतील खापरखेड रोडवरील स्मशानभूमीत मोठ्या प्रमाणात झाडे असल्याने ती पक्ष्यांसाठी नैसर्गिक आश्रयस्थान ठरत आहे.



पक्ष्यांना मदत करण्यासाठी कल्पक योजना हाती घेतली.

